**ठळक बातम्या**

- भारत - ओमान व्यापार शिखर परिषद दोन्ही देशांच्या भागीदारीला एक नवी दिशा आणि गती देईल, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- जीरामजी अर्थात विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान विधेयक लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर

- ‘सिक्युरिटीज मार्केट्स कोड बिल २०२५’ लोकसभेत सादर

- छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत तीन नक्षली ठार

आणि

- आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचं निधन

**<><><><><>**

भारत - ओमान व्यापार शिखर परिषद दोन्ही देशांच्या भागीदारीला एक नवी दिशा आणि गती देईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ओमानची राजधानी मस्कत इथं शिखर परिषदेला संबोधित करत होते. ओमान आणि भारत प्राचीन काळापासून एकमेकांबरोबर व्यापार करत असून, अरबी समुद्र दोन्ही देशांना जोडणारा पूल म्हणून काम करतो असं ते यावेळी म्हणाले. दोन्ही देशांची मैत्री आणखी मजबूत होत असून, हे नातं विश्वासाच्या पायावर उभं असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दोन्ही देशातील आर्थिक भागीदारीमुळे व्यापाराला नवी गती मिळेल, गुंतवणुकीदारांच्या मनात विश्वास निर्माण होईल आणि, प्रत्येक क्षेत्रात संधीची नवी दारं उघडली जातील, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वेगाने जात आहे, याचा फायदा ओमानलाही होणार आहे असं सांगत प्रधानमंत्र्यांनी भारताच्या आर्थिक प्रगतीचा उल्लेख केला. आर्थिक धोरणात मूलभूत बदल केल्यामुळे देश प्रगतीपथावर जात असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**- - -होल्ड बाईट मोदी - -**

त्याआधी काल मस्कत विमानतळावर ओमानचे उपप्रधानमंत्री आणि संरक्षण व्यवहार मंत्री सय्यद शिहाब बिन तारिक अल सैद यांनी प्रधानमंत्री मोदी यांचं स्वागत केलं. विविध क्षेत्रात भारत-ओमान सहकार्य मजबूत करणं आणि धोरणात्मक भागीदारी वाढवणं यावर उभय नेत्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

लोकसभेने विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान अर्थात व्ही बी जी-रामजी विधेयक २०२५ आज लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर झालं.

या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना  केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, ग्रामीण विकास हा त्यांच्या धोरणाचा गाभा आहे. आधीच्या यूपीए सरकारने केवळ २ लाख १३ हजार कोटी रुपये खर्च केले होते. मात्र, रालोआ सरकारने आठ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केल्याचं चौहान म्हणाले. यूपीए सरकारच्या काळात २००६ पासून ते २०१४ पर्यंत १ हजार ६६० कोटी दिवसांची रोजगार निर्मिती झाली होती, तर एनडीए सरकारच्या काळात ३ हजार २१० कोटी दिवसांचा रोजगार निर्माण झाल्याची माहिती चौहान यांनी लोकसभेत दिली.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत 'सिक्युरिटीज मार्केट्स कोड बिल २०२५' सादर केलं. भारतीय शेअर बाजाराशी संबंधित सर्व कायद्यांचं एकत्रीकरण करून त्यामध्ये सुधारणा करणं, हे या विधेयकाचं  उद्दिष्ट आहे. हे विधेयक पुढल्या छाननीसाठी आर्थिक विषयावरच्या संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव सीतारामन यांनी मांडला. विधेयक मांडण्यापूर्वी काँग्रेसचे मनीष तिवारी आणि द्रमुकचे अरुण नेहरू यांनी विधेयक मांडायला विरोध केला होता.

आदिवासी समाजाच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी देशभरात ४४० एकलव्य आदर्श निवासी शाळा कार्यरत असल्याचं आदिवासी कल्याण मंत्री जुआल ओराम यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना सांगितलं. सरकारने ६३ हजार आदिवासी गावांचा विकास करण्यासाठी एकूण ८० हजार कोटी रुपये खर्चाचं धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान सुरू केलं असून, विशेषतः असुरक्षित आदिवासी गटांच्या उन्नतीसाठी पीएम-जनमन योजना सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं.

हवाई मार्गाने देशात प्रादेशिक दळणवळण वाढवण्यासाठी सुरू केलेल्या ‘उडान’ योजने अंतर्गत, देशभरात विमानतळांचं जाळं निर्माण झाल्याचं नागरी विमान विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नांना उत्तर देत होते. याशिवाय आज लोकसभेत नियम १९३ अंतर्गत राजधानी दिल्ली परिसरातल्या प्रदूषणावर चर्चा होणार आहे. काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वड्रा, कनिमोळी करुणानिधी आणि बांसुरी स्वराज, हे सदस्य चर्चेला सुरुवात करतील.

**<><><><>**

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत आज तीन नक्षली मारले गेले. गोलापल्ली पोलीस ठाणे परिसरात आज सकाळी सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलींमधे चकमक सुरू झाली, यात तीन नक्षलींचा मृत्यू झाला. छत्तीसगड राज्यात या वर्षभरात २८४ नक्षली चमकमीकत मारले गेल्याचं सुरक्षा दलानं म्हटलं आहे.

**<><><><>**

२०२९ सालापर्यंत देशाचं संरक्षण उत्पादन दुप्पट करून ते ३ लाख कोटी रुपयांवर नेण्याचं भारताचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेला संबोधित करत होते. देशानं संरक्षण उत्पादनात लक्षणीय वाढ नोंदवली असून, ते १ लाख ५० हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. त्याचप्रमाणे, पुढल्या ४ वर्षांत देशाची संरक्षण निर्यात २५ हजार कोटी रुपयांवरून ५० हजार कोटी रुपयांवर नेण्याचं उद्दिष्ट आहे. यामुळे संरक्षण क्षेत्रात जागतिक नेतृत्व म्हणून भारताची भूमिका बळकट होईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

भारतीय रेल्वेनं लष्करासाठी एक विशेष गाडी चालवून जम्मू इथून काश्मीर खोऱ्यातल्या अनंतनाग मध्ये रणगाडे, तोफखाना आणि डोझरचा ताफा यशस्वीपणे पोहोचवून महत्वाचा टप्पा गाठला आहे. उत्तर रेल्वेनं यापूर्वी काश्मीरमधून सफरचंदाची वाहतूक करण्यासाठी कंटेनर-आधारित वॅगन आणि सिमेंटचा पुरवठा करण्यासाठी विशेष गाड्या चालवल्या आहेत.

**<><><><>**

कोलकाता इथल्या न्यू टाऊन परिसरातल्या एका वस्तीत काल रात्री आग लागल्याची घटना घडली. या दुर्घटनेत सुमारे २०० झोपड्या पूर्णपणे जळून खाक झाल्या असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अग्निशमन दलाच्या वीस गाड्यांनी काही तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सिलिंडरच्या स्फोटानं ही आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आगीमुळे नुकसान झालेल्या कुटुबांना जवळच्या एका शाळेत तात्पुरता निवारा देण्यात आला आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचं आज उत्तर प्रदेशात नोएडा इथं वृद्धापकाळानं निधन झालं, ते १०० वर्षांचे होते. सुतार यांनी २०० पेक्षा जास्त भव्य पुतळे उभारून भारताच्या शिल्पकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवून दिली. गुजरातमधला स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पुतळा त्यांनी उभारला होता.

धुळे जिल्ह्यातल्या गोंडुर या गावात जन्मलेल्या राम सुतार यांनी मुंबईच्या जे जे स्कूल ऑफ आर्ट मध्ये शिक्षण घेतलं. त्यानंतर सरकारी नोकरीच्या काळात त्यांनी अजिंठा – वेरुळ इथल्या शिल्पांच्या डागडुजीचं आणि नंतर पंचवार्षिक योजनांचे लाभ सांगणारी लघुशिल्प बनवण्याचं काम केलं.

राम सुतार यांनी आतापर्यंत संसद भवनाच्या आवारातील अनेक नेत्यांच्या मूर्ती घडवल्या. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक दिग्गजांच्या शिल्पांची त्यांनी निर्मिती केली आहे. फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या ठिकाणीही त्यांनी साकारलेली शिल्प उभी आहेत. शिल्पकलेतल्या योगदानाबद्दल सुतार यांना १९९९ साली पद्मश्री आणि २०१६ साली पद्मभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं आहे. राम सुतार यांना नुकतंच महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुतार यांना आपल्या समाज माध्यमावरच्या शोकसंदेशातून आदरांजली वाहिली आहे. सुतार यांनी त्यांच्या कलाकृतींमधून भारताचा इतिहास, संस्कृती यांना ठसठशीतपणे अभिव्यक्त केल्याचं मोदी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही राम सुतार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ डिसेंबर २०२५ - शुक्रवार

**<><><><><>**

नेदरलँडचे परराष्ट्र मंत्री, 'डेव्हिड व्हॅन-वील', भारताच्या दौऱ्यावर असून, ते आज सकाळी नवी दिल्ली इथं पोहोचले. ते मुंबई इथंही  भेट देणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यात भारत-नेदरलँड दरम्यानचे संबंध अधिक दृढ आणि वैविध्यपूर्ण करण्यावर भर दिला जाईल, असं  परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सीमाशुल्क हा अमेरिकेच्या आर्थिक धोरणाचा महत्वाचा आधारस्तंभ असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल रात्री वर्ष अखेरीनिमित्त केलेल्या भाषणात म्हटलं आहे. देशात कारखान्यांची उभारणी करण्यात आणि रोजगार वृद्धीला चालना देण्यात सीमाशुल्क वाढीचा महत्वाचा वाटा असल्याचं ते यावेळी म्हणाले. सीमाशुल्क ही जागतिक व्यापाराला नवं रूप देणारी एक कायम स्वरूपी व्यवस्था असल्याची आपली भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

दरम्यान, ट्रम्प प्रशासनानं तैवानला १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची शस्त्रास्त्र विकण्याची घोषणा केली आहे.

**//<><><><><>//**